ePaper
कारचे दरवाजे झाले लॉक, 6 महिन्यांच्या गर्भवतीचा होरपळून मृत्यू!

वर्ष - 9 । अंक -82 | UDYAM-MH-26-0158827




महाईन्यूज ™

### आतील पानांत


- IPL 2026 मुंबई इंडियन्सची मोठी डील!
- ऋतुराज गायकवाडचं वादळी शतक
- विरोधकांकडून भाजपावर गंभीर आरोप
- परिस्थिती खूप खूप गंभीर आहे!


www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 14 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**नवले पूल परिसरात विचित्र अपघातः** ब्रेक फेल झालेल्या कंटेनरनं 20 ते 25 वाहनांना उडवलं

# नवले पुलावर भीषण अपघात!

## कंटेनर–कारच्या साखळी धडकेत जिवंत जळून 8 ठार, 25 जखमी

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

पुणे–बंगळुरू महामार्गावरील कुप्रसिद्ध नवले पूल परिसरात गुरुवारी संध्याकाळी पुन्हा एकदा भीषण अपघाताने हाहाकार माजला. काही क्षणांत दोन कंटेनर, एक CNG कार आणि जवळपास २० ते २५ वाहनांचा समावेश असलेला मोठा साखळी अपघात घडला. या अपघातानंतर लागलेली आग एवढी भयंकर होती की पाहताक्षणी दोन कंटेनर आणि मधोमध चिरडलेली कार पूर्णपणे पेटून खाक झाली. प्राथमिक माहितीनुसार ८ जणांचा जिवंत जळून मृत्यू झाला असून २० ते २५ जण गंभीर जखमी आहेत. हा अपघात इतका भीषण होता की काही मिनिटांतच घटनास्थळावर धूर आणि ज्वाळांचे लोट उठले. ज्या कारमध्ये तीन जण अडकले होते, त्या कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाल्याने मृतदेहही





**8 जळून ठार, 25 जखमी**

- नवले पूल परिसरात पुन्हा भीषण अपघात
- दोन कंटेनर, CNG कारची चेन ॲक्सीडेंट धडक
- कारच्या मधोमध अडकल्याने सिलिंडर स्फोट
- 8 मृत, 20–25 गंभीर जखमी
- ब्रेक फेल झाल्याची प्राथमिक शक्यता
- नागरिक संतप्त — कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी
- CNG कारचा स्फोट, दोन्ही कंटेनर पेटले; घटनास्थळी हाहाकार – DCP संभाजी कदम यांची प्राथमिक माहिती

### अपघात कसा घडला?

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, साताऱ्याकडून मुंबईच्या दिशेने जात असलेला राजस्थान पासिंगचा कंटेनर मंद उतारावरून वेगात खाली येत होता. उतारावर असलेल्या अनेक लहान–मोठ्या स्पीड ब्रेकर्समुळे ट्रकचा ब्रेक फेल झाल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

ब्रेक फेल झालेल्या कंटेनरने पुढे असलेल्या २० ते २५ वाहनांना उडवत पुढे सरकत, शेवटी एका CNG कारला जबरदस्त धडक दिली. धडकेच्या जोरावर ती कार पुढील कंटेनरच्या मागे आदळली आणि मधोमध अडकून चिरडली.

कार CNG वर असल्याने काही सेकंदांत सिलिंडरचा स्फोट झाला. स्फोटात कार पेटली आणि तीच आग मागील कंटेनरलादेखील भडकत गेली. पलिकडचा कंटेनरही काही क्षणांत पेटला. दोन्ही मोठ्या वाहनांना एकत्र आग लागल्याने शेकडो मीटरपर्यंत उष्णता आणि धूर पसरला.

### चिरडलेली कार, जळालेले मृतदेह – भयावह दृश्य

अग्निशामक दल, पोलीस आणि स्थानिक नागरिक घटनास्थळी पोहोचेपर्यंत कार आणि कंटेनर पूर्णपणे आगोदर वेढले गेले होते. कारमध्ये दोन महिला आणि एका मुलीचा मृत्यू झाला. कंटेनरमधूनही एक जळालेला मृतदेह बाहेर काढण्यात आला. इतर मृतदेहांची ओळख पटवणे कठीण असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

जखमींच्यावर पुण्यातील विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. काही जखमींची प्रकृती अत्यंत गंभीर आहे.

### वाहतूक ठप्प, तातडीने क्रेन मागवण्यात आल्या

अग्निशामक दलाने शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. त्यानंतर घटनास्थळी जळालेले दोन कंटेनर बाजूला करण्यासाठी क्रेन



### “घातपात नाही; ब्रेक फेल झाल्याची शक्यता” : DCP संभाजी कदम

“कंटेनर साताऱ्याकडून येत होता. उतारावर अनेक गतीरोधक असल्याने ब्रेक फेल होण्याची शक्यता जास्त आहे. अपघातानंतर वाहनांना आग लागली, परंतु घातापाताचा कोणताही पुरावा नाही. सध्या प्राधान्य आहे ते अडकलेल्या लोकांची सुटका, मृतदेह बाहेर काढणे आणि वाहतूक सुरळीत करणे.”

मागवण्यात आल्या. जवळपास एक तासाहून अधिक काळ या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. या ठिकाणी वारंवार घडणाऱ्या अपघातांमुळे स्थानिक नागरिकांत संताप उसळला असून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे.

### नवले पूल – अपघातांचे हॉटस्पॉट

नवले पुलावर यापूर्वीही अनेकदा असे भीषण अपघात झाले आहेत.

उतार, सततची वाहतूक कोंडी, अनियोजित स्पीड ब्रेकर्स आणि वेगावर नियंत्रण नसणे या कारणांमुळे हा परिसर अपघातांचे केंद्र म्हणून ओळखला जातो.

आजचा अपघातही त्याच मालिकेतील सर्वात भीषण स्वरूपाचा ठरला आहे. स्थानिक नागरिकांनी पुन्हा एकदा प्रशासनाविरोधात रोष व्यक्त करत “कायमस्वरूपी उपाययोजना करा, अन्यथा मोठं आंदोलन” असा इशारा दिला आहे.

### घटनास्थळी सुरु बचावकार्य

अग्निशामक दलाचे जवान आगीवर नियंत्रण मिळवत असताना, पोलीस मृतदेह शोधणे, जखमींना बाहेर काढणे आणि वाहतूक व्यवस्थापन अशी तीन पातळीवर कामे सुरू आहेत.

## वाहतूक कोंडी

## ‘बोलार्ड’ हटविले वाहतूक कोंडी सुटणार?

# पिंपरी सुधारण्याचा प्रयोग फसला

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाहतूक कोंडीच्या दृष्टीने ( जंक्शन इम्प्रूव्हमेंट) चौक सुधारणा करण्यासाठी पुणे-मुंबई महामार्गावरील अहिल्यादेवी होळकर (मोरवाडी) चौकातील सेवा रस्ता प्लास्टिकचे खांब (बोलार्ड), सिमेंटचे ब्लॉक टाकून अरूंद केल्याने वाहतूक कोंडीत प्रचंड भर पडत असल्याचे लक्षात येताच महापालिकेने हा निर्णय मागे घेतला आहे. चौकातील प्लास्टिकचे खांब, ब्लॉक हटविले असून, रस्ता मोकळा केला आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत झाल्याचे दिसून येत आहे.**

## वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत



महापालिकेच्या वतीने अहिल्यादेवी होळकर चौकात वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उपाययोजना हाती घेतल्या होत्या. त्यासाठी सिमेंटचे ब्लॉक, प्लास्टिकचे खांब टाकून पादचाऱ्यांच्या सोईसाठी रस्ता अरूंद केला होता. या उपाययोजनांमुळे वाहतूक कोंडी कमी होण्याऐवजी त्यात भर पडली. पिंपरीतून मोरवाडी चौक ओलांडण्यासाठी वाहनचालकांना वाहतूक नियंत्रण दिव्यापाशी (सिग्नल) किमान चार ते पाच वेळा लाल दिव्याला थांबावे लागत होते. वाहनांच्या मोठ्या रांगा लागत होत्या. त्यामुळे पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातही कोंडी होत होती.याच सेवा रस्त्यावर निगडी ते दापोडी या बीआरटी मार्गातून जलवाहिनीचे काम सुरू आहे. त्यामुळे पीएमपी बसही सेवा रस्त्याने धावत आहेत. बस थांबा रस्त्यावरच आहे. प्रवाशीही रस्त्यावरच बसची प्रतीक्षा करत थांबतात. परिणामी, पिंपरी आणि मोरवाडी परिसरात मागील काही दिवसांपासून प्रचंड वाहतूक कोंडी होत होती. महापालिकेच्या चौक सुधारण्याच्या या प्रयोगाला आमदार, वाहनचालकांनी जोरदार विरोध केला. काही संघटनांनी आंदोलन केले. अखेरीस वाहतूक कोंडी आणि वाढता विरोध पाहता महापालिकेच्या शहरी दळणवळण विभागाने चाचपणी पूर्ण झाल्याचा दावा करून खांब आणि सिमेंटचे ब्लॉक हटविले आहेत. त्यामुळे चालकांची कोंडीतून काहीशी सुटका झाली आहे.महापालिकेने पुणे-मुंबई महामार्गावर पिंपरी ते चिंचवडदरम्यान अर्बन स्ट्रीट डिझाइननुसार रस्त्यांची रचना केली आहे.

यामुळे रस्ते अरूंद झाले असून, पदपथ मोठे झाले आहेत. त्यातच खांब, सिमेंटचे ब्लॉक टाकल्याने रस्ता आणखी अरूंद झाला. त्यामुळे मोरवाडी न्यायालयाची इमारत ते अहिल्यादेवी होळकर चौक आणि महामार्गावरील दोन्ही बाजूला महापालिका मुख्यालयासमोरच सकाळ आणि संध्याकाळच्या वेळी वाहनांच्या रांग लागतात. सेवा रस्त्याच्या एकाच बाजूला पादचाऱ्यांसाठी महामेट्रोच्या पुलाचे आणि महापालिकेच्या जलवाहिनीचे काम सुरू आहे. महामेट्रोचे स्थानकही याच परिसरात आहे. त्यामुळे कोडीत मोठी भर पडते. चौकात सुधारणा करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमुळे वाहतूक कोंडीत भर पडत होती. त्यामुळे या निर्णयाचा फेरविचार करावा, असे पत्र महापालिका प्रशासनाला दिले होते. महापालिकेने सिमेंटचे ब्लॉक, खांब हटविले आहेत, असे पिंपरीच्या वाहतूक विभागाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वर्षाराणी पाटील यांनी सांगितले.

वाहतूक कोंडी कमी व्हावी, नागरिकांना सुरक्षित रस्ता ओलांडता यावा, यासाठी सिमेंटचे ब्लॉक, खांब टाकून काही दिवस चाचणी घेतली. यामुळे होणाऱ्या परिणामांचे निरीक्षण केले. मेट्रोच्या स्थानकामुळे प्रवाशांची गर्दी होत आहे. पादचाऱ्यांना वाहनांपासून दूर पदपथावर थांबता यावे, यासाठी नियोजन केले होते. हा चौक अतिधोकादायक असून, गंभीर अपघात झाले आहेत. जलवाहिनी, मेट्रोचे काम पूर्ण झाल्यानंतर पोलिसांच्या मान्यतेने पुन्हा या निर्णयाची अंलबजावणी करण्याचा विचार आहे. रिक्षाचालकांना थांब्यासाठी योग्य ठिकाणी जागा देण्याचे नियोजन सुरू असल्याचे सह शहर अभियंता बापूसाहेब गायकवाड यांनी सांगितले.

### पदपथ मोठे, रस्ते अरुंद

महापालिकेने पुणे-मुंबई महामार्गावर पिंपरी ते चिंचवडदरम्यान अर्बन स्ट्रीट डिझाइननुसार रस्त्यांची रचना केली आहे. यामुळे रस्ते अरूंद झाले असून, पदपथ मोठे झाले आहेत. त्यातच खांब, सिमेंटचे ब्लॉक टाकल्याने रस्ता आणखी अरूंद झाला. त्यामुळे मोरवाडी न्यायालयाची इमारत ते अहिल्यादेवी होळकर चौक आणि महामार्गावरील दोन्ही बाजूला महापालिका मुख्यालयासमोरच सकाळ आणि संध्याकाळच्या वेळी वाहनांच्या रांग लागतात.

# ताथवडेत शासकीय जमीन घोटाळा

## पशुसंवर्धन विभागाच्या जागेची परस्पर विक्री, दुय्यम निबंधक निलंबित

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंढवा आणि बोपोडी येथील शासकीय जमीन गैरव्यवहार प्रकरणानंतर आता ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाची पंधरा एकर जागेची परस्पर विक्री झाल्याचा प्रकार पुढे आला आहे. या बेकायदा जागा विक्रीबाबतची तक्रार विभागीय आयुक्तांकडे करण्यात आल्यानंतर प्रभारी सह दुय्यम निबंधक, वरिष्ठ लिपक विद्या शंकर बडे-सांगळे यांना निलंबीत करण्यात आले आहे.**




ताथवडे येथे पशुसंवर्धन विभागाची ७२ हेक्टर (सुमार १७८ एकर) जागा आहे. त्यापैकी एका गटातील पंधरा एकर जागेवर पशुसंवर्धन विभागाचे नाव इतर अधिकारात आहे. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाच्या पूर्व परवानगीशिवाय जमिनीचा व्यवहार करता येत नसतानाही अकरा महिन्यांपूर्वी जागेचा व्यवहार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. संबंधित जागा खासगी मालकीची असली तरी इतर अधिकार पशुसंवर्धन विभागाची अशी नोंद आहे.

या जागेसंदर्भात उच्च न्यायालयात संबंधित मालकाने दावा दाखल केला होता.

उच्च न्यायालयात दाव्याच्या निकालात मालकीसंदर्भात कोणतेही भाष्य केलेले नव्हते. त्यामुळे सातबारा उताऱ्यावर इतर अधिकारात पशुसंवर्धन विभागाचे नाव कायम राहिले आहे. त्यानंतर जानेवारी महिन्यात जागा विक्रीचा व्यवहार करण्यात आला होता.ही जमीन पशुसंवर्धन विभागाला अंधार ठेवून परस्कर विकण्यात आल्याचे आणि व्यवहाराची कागदपत्रेही तयार करण्यात आली होती.

या विक्रीचा दस्त झाल्याची माहिती पशुसंवर्धन विभागाला मिळाल्यानंतर विभागीय आयुक्तांनाकडे यासंदर्भातील तक्रार करण्यात आली होती.

### बडे यांच्यावर ठपका

शुल्क विभागाकडून सुरू करण्यात आली होती. त्यानंतर विद्या शंकर बडे यांचे निलंबन करण्यात आले आले आहे. नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक रवींद्र बिनवडे यांनी त्यासंदर्भातील लेखी आदेश काढले आहेत.दस्त नोंदणी करताना अद्यावत किंवा नजकीच्या कालावाधतीली सातबारा उताराला जोडलेला नसल्याची बाब दुर्लक्षित करून पशुसंवर्धन विभागाचा ताबा असलेली आणि शासनाची पूर्व परावनगी न घेता खरेदी विक्रीस बंदी असलेल्या मिळकतीचा खरेदी विक्रीचा दस्ताऐवज नोंदणी केल्याचा ठपका बडे यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

पर्यावरण संवर्धन

तब्बल 35 हजार सायकलपटू देणार

# नदी स्वच्छता-पर्यावरण संवर्धनाचा संदेश!

## विश्वविक्रमी ‘रिव्हर सायक्लोथॉन-2025’ ची तयारी सुरू; अविरत श्रमदानचे डॉ. निलेश लोंढे यांची माहिती

।पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पर्यावरण संवर्धनाचा संदेश घेऊन इंद्रायणी नदीकाठी पुन्हा एकदा सायकलची चाके फिरणार आहेत. “इंद्रायणी नदी स्वच्छता जनजागृती मोहिमे” अंतर्गत आयोजित “रिव्हर सायक्लोथॉन-2025” या भव्य उपक्रमात यंदा तब्बल ३५ हजाराहून अधिक सायकलपटू सहभागी होणार आहेत. हा उपक्रम रविवार, दि. 23 नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी 6 ते 10 या वेळेत “स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण” छत्रपती संभाजी महाराज स्मारक, बोऱ्हाडे वाडी, मोशी येथून सुरू होईल, अशी माहिती अविरत श्रमदान संस्थेचे डॉ. निलेश लोंढे यांनी दिली.**




आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, अविरत श्रमदान, सायकल मित्र, WTE फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा सामाजिक उपक्रम राबवला जात आहे. “एक पाऊल भावी पिढीसाठी” हे या मोहिमेचे ब्रीदवाक्य असून, नागरिकांमध्ये पर्यावरण व आरोग्याविषयी जनजागृती घडविणे हा मुख्य हेतू आहे.

या सायक्लोथॉनमध्ये 5, 15 आणि 25 किमी असे तीन ट्रॅक असून सर्व वयोगटातील सायकलप्रेमींना सहभागी होता येणार आहे. सहभागींसाठी प्रमाणपत्र, टी-शर्ट, मेडल, कॅप, बाटली आणि स्नॅक्सची व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमाने यापूर्वीच ‘LONGEST CHAIN OF CYCLISTS’ साठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मिळवला असून, यंदा विक्रमी 35 हजार सायकलपटूंच्या सहभागामुळे इंद्रायणी नदी स्वच्छतेचा संदेश आणखी प्रभावीपणे समाजात पोहोचणार आहे.

> “इंद्रायणी नदी ही आपल्या संस्कृतीची आणि जीवनाची ओळख आहे. तिचे संवर्धन ही केवळ जबाबदारी नसून अभिमानाची बाब आहे. ‘रिव्हर सायक्लोथॉन 2025’ मधून 35 हजार सायकलपटू एकत्र येऊन स्वच्छतेचा, आरोग्याचा आणि पर्यावरणप्रेमाचा संदेश देणार आहेत. युवकांचा उत्साह आणि समाजाचा सहभाग पाहता, आपण नक्कीच ‘स्वच्छ नदी – हरित भविष्य’ हे स्वप्न साकार करू.”
>
> **–डॉ. निलेश लोंढे,** अविरत श्रमदान

# पीसीएमसीमध्ये ठाकरे+काँग्रेस “आघाडी” सर्व जागा लढवणार!

## शिवसेना ठाकरे गटाचे शहराध्यक्ष संजोग वाघेरे यांचे सूतोवाच : पहिल्या टप्प्यातील इच्छुकांच्या मुलाखती पूर्ण

।पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरात दोन्ही राष्ट्रवादीचे गट एकत्र येण्याच्या हालचालींनी रंग चढत असतानाच, आता शिवसेना उद्धव ठाकरे गट- मनसे आणि काँग्रेसने महापालिकेच्या सर्व जागांवर एकत्र लढण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे शिवसेना उबाठा+ मनसे+ काँग्रेस अशी “आघाडी” भाजपा आणि राष्ट्रवादीशी दोनहात करणार आहे, असे चित्र निर्माण झाले आहे.**



शिवसेना ठाकरे गटाचे शहराध्यक्ष संजोग वाघेरे यांनी याबाबत सूतोवाच केले. त्यांच्याकडे मावळ लोकसभा आणि पिंपरी-चिंचवड शहराची जबाबदारी आहे. शहरातील 32 प्रभागांमध्ये इच्छुकांच्या मुलाखती सुरू आहेत. वाघेरे म्हणाले की, “पहिल्या टप्प्यात इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती पूर्ण झाल्या असून, आघाडीच्या माध्यमातून सर्वच १२८ प्रभागांवर आमची लढत होणार आहे.” त्यांनी पुढे म्हटले की, काँग्रेससोबत समन्वय बैठका सुरू आहेत आणि ‘महाविकास आघाडी’ (ठाकरे गट + मनसे + काँग्रेस + इतर पुरोगामी संघटना) म्हणून प्रत्येक प्रभागात भाजपाविरुद्ध मजबूत उमेदवार उभे करण्यात येणार आहेत.

> महानगरपालिका निवडणूक शिवसेना ठाकरे गट+ मनसे आणि काँग्रेस एकत्रित लढण्याबाबत पक्षश्रेष्ठी निर्णय घेतली. आम्ही शहरातील सर्व 128 जागांवर उमेदवार देणार आहोत. त्याअनुशंगाने आम्ही मुलाखती सुरू केल्या आहेत. पिंपरी-चिंचवडमध्ये शिवसेनेला मानणारा मतदार वर्ग आहे. मनसे आणि काँग्रेस एकत्रित ताकद झाली, तर निश्चितपणे भाजपासमोर तगडे आव्हान उभे राहील.
>
> **–संजोग वाघेरे,** शहराध्यक्ष, शिवसेना उबाठा, पिंपरी-चिंचवड.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाने महाविकास आघाडीत एकत्रित निवडणूक लढवली. किंबहुना, विधानसभा निवडणुकीत शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी अशा तिनही मतदार संघांमध्ये “तुतारी”च्या चिन्हावर उमेदवार देण्यात आले होते. त्याच वेळी निष्ठावंत शिवसैनिकांनी एकप्रकारे उठाव केला होता.

आता आगामी महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार गटाने दोन्ही राष्ट्रवादी एकत्र करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. काँग्रेसच्या प्रदेश नेत्यांकडून दोन्ही ठाकरेंसोबत एकत्र निवडणूक लढवण्याबाबत मतभिन्नता व्यक्त केली जात आहे.

राष्ट्रवादी शरद पवार गट महाविकास आघाडीला सोडून राष्ट्रवादी अजित पवार गटासोबत लढल्यास शिवसेना ठाकरे गट एकाकी पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे ठाकरे बंधू आणि काँग्रेस अशी “आघाडी” करण्याबाबत प्रदेश पातळीवर हालचालींना वेग आला आहे.




# निवडणूक बिहारची, कसोटी दिल्लीची !



बिहार विधानसभा निवडणुकीने दिल्लीचंही राजकीय पारडं हलवून टाकलं आहे. पहिल्या टप्प्याच्या मतदानानंतर राजधानीत बैठकींचा धडाका सुरू झाला आहे. सत्ताधारी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या चेहऱ्यांवर चिंता स्पष्ट दिसतेय. सत्तेच्या आशा अपेक्षांमध्ये दिल्लीच्या कानाकोपऱ्यांत अचानक निर्माण झालेली ही हालचाल लक्षवेधी आहे. या बैठकांचं सूत्र दिल्लीतील 'राजकीय चाणक्य'च्या हातात आहे, जे प्रत्येक नेत्याकडून सतत फीडबॅक घेत आहेत आणि त्यावर आधारित तातडीने निर्णय घेतले जात आहेत. बिहारमधील पहिल्या टप्प्याचे मतदान संपल्यानंतर लागलीच दिल्लीमध्ये अंदाज आणि तकांची कुजबुज सुरू झाली. अनेक नेते थेट दिल्लीला रवाना झाले आणि त्यांनी आपापल्या वरिष्ठांना ग्राऊंड रिॲलिटीची माहिती दिली.

सर्वच पक्षांच्या मुख्यालयांत गुणाकार, विश्लेषण आणि खऱ्या चित्राचा अंदाज बांधण्याचे काम सुरू आहे. काही नव्या घटनांमुळे बिहारच्या राजकारणाची दिशा बदलताना दिसतेय. राजदमध्ये बंडखोरी करून जनशक्ती जनता दल (जजद) स्थापन करणारे लालू प्रसाद यादव यांचे मोठे पुत्र तेजप्रताप यादव पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. केंद्र सरकारने त्यांना अचानक वाय प्लस सुरक्षा दिली आहे आणि ही घोषणा पहिल्या टप्प्याच्या मतदानानंतर लगेच झाली. केंद्राचा हा निर्णय केवळ सुरक्षा कारणासाठी नसून, तो एक स्पष्ट राजकीय संदेश मानला जातो. याआधी उत्तर प्रदेशच्या निवडणुकीदरम्यान असदुद्दीन ओवेसींनाही अशाच प्रकारे सुरक्षा देण्यात आली होती. त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, तेजप्रताप यांना मिळालेली ही सुरक्षा फक्त योगायोग आहे का, की एखादे नियोजित राजकीय पाऊल? तेजप्रताप यादव यांनी या निवडणुकीत २२ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. त्यांच्या समर्थकांचा दावा आहे की, किमान ४ ते ५ जागा बिहारमधील पहिल्या टप्प्यातील मतदानानंतर राजधानी दिल्लीत बैठकांचा सपाटा सुरू आहे. तेजप्रताप यादव यांचा नवा पक्ष, त्यांना केंद्राने दिलेली वाय प्लस सुरक्षाव्यवस्था, नितीश कुमार यांनी बदललेली रणनीती आणि भाजपचा प्रचारातील यू टर्न यातून दिसतेय की, बिहारची निवडणूक ही केवळ राज्याची नाही, तर दिल्लीच्या सत्तेचीही कसोटी आहे. ते जिंकतील; पण किती जागा मिळाल्या, तरी नुकसान आरजेडीलाच होणार. कारण, त्यांच्या बहुतेक उमेदवारांनी लालू-राबडीच्या पारंपरिक मतदारसंघांमध्ये स्पर्धा उभी केली आहे. तेजप्रताप यांनी नुकतेच म्हटले होते की, यावेळचा 'किंगमेकर' मीच असेन. हे विधान त्यांच्या आत्मविश्वासाचे आणि महत्वाकांक्षेचे द्योतक आहे. केंद्राने त्यानंतरच त्यांची सुरक्षा वाढवली. हे योगायोग नसल्याचं अनेकांचं मत आहे. दिल्लीतील रणनीतिकारांचं मत आहे की, तेजप्रतापांचा मतशेअर ३-४ टक्के झाला, तर त्याचा थेट तोटा आरजेडीला आणि अप्रत्यक्ष फायदा एनडीएला होईल. म्हणूनच दिल्लीच्या गलियाऱ्यांमध्ये त्यांच्या 'महत्त्वा' बद्दल कुजबुज सुरू आहे. अर्थात, हे पहिल्यांदाच नाही की, दिल्लीच्या राजकारणाने पाटण्यातील समीकरण बदलले आहे. २०१० मध्येही नितीश कुमार यांनी भाजपसोबतची आघाडी तोडण्यापूर्वी दिल्लीचे इशारे पाहिले होते; पण यावेळी खेळ अधिक गुंतागुंतीचा आहे. बिहारमधील लढत काट्याची आहे. कोण आघाडीवर आहे, याबाबत कोणीही ठाम सांगू शकत नाही. दोन्ही आघाड्यांचे नेते विजयाचे दावे करत असले, तरी आंतरिक चिंतेची पातळी उंच आहे. त्यामुळेच दिल्लीतील बैठकांचं सत्र अखंड सुरू आहे. प्रत्येक बूथचा हिशेब, जातीय समीकरणं आणि मतदानाच्या ट्रेंड्स्वर बारकाईने विश्लेषण सुरू आहे. 'गुप्त बैठकां 'मध्ये वरिष्ठ नेते लल्लन सिंह आणि संजय झा यांना बोलावण्यात आले नाही; मात्र त्यांच्या विश्वासू सल्लागार मनीष वर्मा आणि काही वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत ते सातत्याने ग्राऊंड रिपोर्टस्वर काम करत आहेत. हे दर्शवते की, नितीश या वेळी पूर्णपणे 'सिस्टम मोड'मध्ये आहेत.

**'लोकल विरुद्ध नॅशनल' असा संघर्ष स्पष्ट झाला आहे. दिल्लीतील राजकीय कथा भेट गावागावांत पोहोचत आहेत, तर बिहारमधून मिळणाऱ्या रिपोर्टस्नी दिल्लीच्या राजकीय समीकरणांना हादरे बसत आहेत. नितीश कुमार आणि भाजप यांच्यातील नाते आता 'थंड' न राहता उघडपणे 'दुरावाचे' रूप घेत आहे. भाजपमधील काहींचे म्हणणे आहे की, जर निकाल अपेक्षेप्रमाणे आला नाही, तर त्याचा धक्का थेट केंद्राला बसेल.**

## प्रासंगिक »

### प्रस्ताव स्वागतार्ह

*वाणिज्य व उद्योग मंत्रालयाचा नवा प्रस्ताव इन्व्हेंटरी आधारित ई-कॉमर्स क्षेत्रात प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक करण्यासंदर्भात आहे. .*

वाणिज्य व उद्योग मंत्रालयाचा नवा प्रस्ताव इन्व्हेंटरी आधारित ई-कॉमर्स क्षेत्रात प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक करण्यासंदर्भात आहे. सरकारने अप्रत्यक्षपणे मान्य केले आहे की, ई-कॉमर्स केवळ खरेदी-विक्री नसून उत्पादन, लॉजिस्टिक्स आणि निर्यात अशा पुरवठा साखळीचा एकत्रित भाग आहे. भारतामध्ये रतामध्ये सध्या मार्केटप्लेस मॉडेलमध्ये १०० टक्के परकीय गुंतवणुकीला परवानगी आहे.

या प्रकारात ई-कॉमर्स कंपनी स्वतः उत्पादन विकत नाही, ती फक्त मध्यस्थाची भूमिका बजावते. म्हणजे विक्रेते आणि खरेदीदार यांना एकत्र आणते. उदाहरणार्थ, ई-कॉमर्सवरून मोबाईल खरेदी करता तेव्हा तो मोबाईल त्या प्लॅटफॉर्मकडे नसतो, तर एखाद्या तृतीय पक्ष विक्रेत्याकडे असतो; पण इन्व्हेंटरी आधारित मॉडेलमध्ये ई-कॉमर्स कंपनी स्वतः उत्पादन खरेदी करते, त्याचा साठा ठेवते आणि थेट ग्राहकाला विकते.

दोन महिन्यांपूर्वी दहशतवादविरोधी मोहिमेत, दिल्ली पोलिसांच्या विशेष कक्षाने केंद्रीय एजन्सी आणि राज्य एटीएस युनिटस्च्या समन्वयाने संपूर्ण भारतात 'इसिस' संबंधित एका मॉड्यूलचा पर्दाफाश केला होता. अनेक राज्यांमध्ये एकाच वेळी छापे टाकून पाच अत्यंत कट्टरपंथी तरुणांना अटक केली होती.

# 'इसिस'चा मॉड्यूल 'प्रोजेक्ट मुस्तफा'

मुंब्यातील दोन तरुणांचा समावेश होता. 'प्रोजेक्ट मुस्तफा' च्या नावाखाली भारतातील काही राजकीय नेत्यांच्या हत्या आणि दहशतवादी हल्ले घडवून आणण्याचा त्यांनी कट रचला होता, अशी माहिती तपास यंत्रणांच्या चौकशीतून समोर आली आहे. दिल्ली येथे झालेल्या कार स्फोटाच्या घटनेनंतर दहशतवादी संघटनांशी संबंधित गद्दारांची देशभरात धरपकड सुरू झाली आहे. दहशतवाद्यांशी संबंधित असणाऱ्या संशयितांवर तपास यंत्रणांनी करडी नजर रोखली आहे. तपास यंत्रणांनी आतापर्यंत देशभरातून अनेक संशयित दहशतवाद्यांना अटक केली आहे. या कारवाईत वेळोवेळी दहशतवाद्यांचे ठाणे कनेक्शन समोर आलेले आहे. एनआयए, एटीएस व इतर तपास यंत्रणांनी ठाणे जिल्ह्यातील कल्याण, भिवंडी, मुंब्रा आणि पडघा-बोरिवली या ठिकाणी सर्च ऑपरेशन राबवून संशयास्पद हालचालींवर करडी नजर रोखली आहे. याच मोहिमेंतर्गत सप्टेंबर महिन्यात दहशतवादविरोधी



मोहिमेत एटीएस व दिल्ली पोलिसांच्या विशेष कक्षाने केंद्रीय तपास यंत्रणांच्या मदतीने 'इसिस' या दहशतवादी संघटनेशी संबंधित 'प्रोजेक्ट मुस्तफा' मॉड्यूलचा पर्दाफाश केला होता. अनेक राज्यांमध्ये एकाच वेळी छापे टाकून ५ अत्यंत कट्टरपंथी तरुणांना अटक केली होती. त्यात कल्याणचा आफताब कुरेशी (वय २५), तर मुंब्रातील सुफियान अबुबकर खान (२०) या दोन तरुणांचा समावेश होता, अटक केलेले सर्व संशयित २० ते २६ वर्षे वयोगटातील असून, ते पाकिस्तानस्थित हँडलरच्या थेट संपर्कात राहून भारतात कट्टरपंथीय तरुणांचे नेटवर्क स्थापित करण्याचे काम करत होते. या मॉड्यूलचे नेतृत्व झारखंडमधील बोकारो येथील रहिवासी अशर दानिश (२३) करत होता. हाच दानिश या साऱ्या प्रोजेक्टचा मुख्य सूत्रधार होता. तो

पाकिस्तानमधील एका हँडलरच्या थेट संपर्कात होता. 'प्रोजेक्ट मुस्तफा' नावाचा ४० सदस्यांचा सोशल मीडिया ग्रुपदेखील तो चालवत होता, जो जिहादी कारवाया करण्यासाठी आणि सदस्यांची भरती करण्यासाठी वापरला जात होता. दानिशने 'प्रोजेक्ट मुस्तफा'च्या नावाखाली भारतातील काही राजकीय नेत्यांच्या हत्या आणि दहशतवादी हल्ले घडवून आणण्याचा कट रचला होता, असे यंत्रणांच्या तपासातून समोर आले आहे. देशविघातक कारवाईत गुंतलेले हे दहशतवादी सोशल मीडियावर व्हॉटस्ॲप, इन्स्टाग्राम, टेलिग्राम आणि फेसबुकवर सक्रिय राहून एकमेकांच्या संपर्कात राहत होते. एकमेकांशी संपर्क करताना ही मंडळी सांकेतिक भाषेचा वापर करत असत, यामध्ये गजवा लीडर, प्रोफेसर आणि सीईओ कंपनी असे कोड सामील होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**थेट विक्रीवर येणार**

## नागरी पुरवठा विभागाने काढला शासन निर्णय

# विक्रेत्यांच्या थेट विक्रीवर येणार

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात उत्पादनांची थेट विक्री करणाऱ्या कंपन्या आणि विक्रेत्यांवर आता निर्बंध येणार आहेत. सद्यस्थितीत राज्य सरकारकडून थेट विक्री संदर्भात तसेच थेट विक्री करणाऱ्या कंपन्या आणि विक्रेत्यांवर देखरेख, पर्यवेक्षणाकरिता कोणतीही नियमावली अथवा मार्गदर्शक सूचना नाहीत. त्यामुळे थेट विक्रीवर देखरेख ठेवण्यासाठी, पर्यवेक्षण करण्यासाठी नियम निश्चित करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे.**

## कोणत्याही स्वरुपाचे नियम नाहीत



राज्यात सद्यस्थितीत उत्पादनांची थेट विक्री करणाऱ्या कंपन्या आणि विक्रेत्यांना कोणत्याही स्वरुपाचे नियम नाहीत. त्यामुळे राज्य सरकारकडून थेट विक्री संदर्भात तसेच थेट विक्री करणाऱ्या कंपन्या आणि विक्रेत्यांवर देखरेख, पर्यवेक्षणाकरिता कोणतीही नियमावली अथवा मार्गदर्शक सूचना तयार करण्याबाबत ऑक्टोंबर महिन्यात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत थेट विक्री करणाऱ्या कंपन्या आणि विक्रेत्यांवर देखरेख, पर्यवेक्षण करण्यासाठी नियम, मार्गदर्शक सूचनांचे प्रारुप तयार करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वतीने शासन निर्णय जारी करून समितीची स्थापना करण्यात आली आहे.समितीचे अध्यक्ष अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे उप सचिव असणार आहेत. सदस्य म्हणून वैध मापन शास्त्र विभागाचे नियंत्रक, इंडियन डायरेक्ट सेलिंग असोशिएशनचे सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अवर सचिव आणि कक्ष अधिकारी सदस्य म्हणून काम करणार आहेत. ही समिती अन्य राज्यांत थेट विक्री बाबत नियम, मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास करून राज्य सरकारला शिफारस करणार आहे.कंपन्यांची विक्रेत्यांमार्फत थेट विक्री म्हणजे कंपन्या मध्यस्थांना वगळून, स्वतंत्र विक्रेत्यांमार्फत उत्पादने थेट ग्राहकांना विकतात. या प्रक्रियेत, कंपनीकडून उत्पादने खरेदी करून किंवा कमिशन मिळवून, हे विक्रेते थेट ग्राहकांना विक्री करतात. कंपन्या मध्यस्थांऐवजी थेट विक्रेत्यांमार्फत ग्राहकांशी संपर्क साधतात. तसेच काही कंपन्या थेट बाजारात विक्री करतात तर काही कंपन्या विक्रेत्यांच्या माध्यमातून उत्पादनांची विक्री करतात.राज्यात सद्यस्थितीत उत्पादनांची थेट विक्री करणाऱ्या कंपन्या आणि विक्रेत्यांना

### मार्गदर्शक सूचना नाहीत

तसेच काही कंपन्या थेट बाजारात विक्री करतात तर काही कंपन्या विक्रेत्यांच्या माध्यमातून उत्पादनांची विक्री करतात.विक्री करणाऱ्या कंपन्या आणि विक्रेत्यांवर आता निर्बंध येणार आहेत. सद्यस्थितीत राज्य सरकारकडून थेट विक्री संदर्भात तसेच थेट विक्री करणाऱ्या कंपन्या आणि विक्रेत्यांवर देखरेख, पर्यवेक्षणाकरिता कोणतीही नियमावली अथवा मार्गदर्शक सूचना नाहीत.

कोणत्याही स्वरुपाचे नियम नाहीत. त्यामुळे राज्य सरकारकडून थेट विक्री संदर्भात तसेच थेट विक्री करणाऱ्या कंपन्या आणि विक्रेत्यांवर देखरेख, पर्यवेक्षणाकरिता कोणतीही नियमावली अथवा मार्गदर्शक सूचना तयार करण्याबाबत ऑक्टोंबर महिन्यात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत थेट विक्री करणाऱ्या कंपन्या आणि विक्रेत्यांवर देखरेख, पर्यवेक्षण करण्यासाठी नियम, मार्गदर्शक सूचनांचे प्रारुप तयार करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वतीने शासन निर्णय जारी करून समितीची स्थापना करण्यात आली आहे.समितीचे अध्यक्ष अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे उप सचिव असणार आहेत. सदस्य म्हणून वैध मापन शास्त्र विभागाचे नियंत्रक, इंडियन डायरेक्ट सेलिंग असोशिएशनचे सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अवर सचिव आणि कक्ष अधिकारी सदस्य म्हणून काम करणार आहेत. ही समिती अन्य राज्यांत थेट विक्री बाबत नियम, मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास करून राज्य सरकारला शिफारस करणार आहे.कंपन्यांची विक्रेत्यांमार्फत थेट विक्री म्हणजे कंपन्या मध्यस्थांना वगळून, स्वतंत्र विक्रेत्यांमार्फत उत्पादने थेट ग्राहकांना विकतात. या प्रक्रियेत, कंपनीकडून उत्पादने खरेदी करून किंवा कमिशन मिळवून, हे विक्रेते थेट ग्राहकांना विक्री करतात. कंपन्या मध्यस्थांऐवजी थेट विक्रेत्यांमार्फत ग्राहकांशी संपर्क साधतात.

# सरकारमधून बाहेर पडण्याचा इशारा

## सरकारमधून बाहेर पडून बाहेरून सरकारला पाठिंबा देऊ

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पार्थ पवार जमीन खरेदी प्रकरणात भाजपचे षडयंत्र आहे. या प्रकरणावरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत सरकारमधून बाहेर पडण्याची भाषा केली, असा दावा विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला.**

‘वर्षा’वरील बैठकीची माहिती आपल्या कानावर आली आहे. पार्थ पवार प्रकरणी शरद पवार यांनी दिलेली प्रतिक्रिया बोलकी आहे. थेट मुख्यमंत्र्यांनी भूमिका घेतल्याशिवाय पार्थ पवार वाचू शकत नाहीत. ‘वर्षा’ बंगल्यावर जी बैठक झाली त्यात अजित पवारांनी संतप्त भूमिका घेतली होती. यात त्यांनी सरकारमधून बाहेर पडण्याचीही भाषा केली. अजित पवारांनी रागाने सरकारमधून बाहेर पडून बाहेरून सरकारला पाठिंबा देऊ असे म्हटल्याने त्यांना आणि पार्थ पवारांना वाचवले जात असल्याचा दावा दानवे यांनी केला.पुण्यातील प्रकरणाबाबत भाजपला माहिती होती, हे सर्व उघड झाल्यानंतर अजित पवार अडचणीत येतील हा त्यांचा उद्देश होता. ही त्यांची व्यूहरचनाच आहे. आता अजित दादांची फाईल तयार केली आहे. उद्या जर अजित पवारांनी काही केले



तर एक मिनिटात पार्थ पवारांना अटक होऊ शकते. हे भाजपाचे षड्यंत्र आहे. त्यातूनच पार्थ पवार प्रकरण बाहेर आले असल्याचे दानवे म्हणाले. भाजपानेच प्रकरण बाहेर काढायचे, संबंधितांनी आपले ऐकले पाहिजे अशा दृष्टीने प्रयत्न करायचे. एकीकडे महार वतनाची जमीन विकली जाते. कंपनीचा संचालक म्हणून पार्थ पवार यांच्यावर कारवाई का होत नाही. मुंद्राक शुल्क माफ केले जाते. दुसरीकडे व्यवहार रद्द झाला सांगतात, मात्र कायद्याने व्यवहार रद्द झाला तरीही मुंद्राक शुल्क भरावेच लागेल असे अधिकारी सांगतायेत. त्यामुळे चंद्रशेखर बावनकुळे यांनी जी भूमिका घेतली ती चूक आहे. लोकसभा लढणारा माणूस बाळ नाही. एक भारताचा नागरीक आणि गुन्हेगार म्हणून त्यांना वागवले पाहिजे, अशीही मागणीही दानवे यांनी केली.निवडणुकीच्या तोंडावर अजित पवारांच्या पक्षाचा घोटाळा बाहेर काढून त्यांची कोंडी करण्यात आली आहे. येणाऱ्या निवडणुकीत पुणे, पिंपरी, चिंचवड, सातारा, सांगली, मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत पक्षाने भाजप पुरक भूमिका घ्यावी या हिशेबाने अजित पवार यांचा पक्ष कमजोर करण्याचा डाव दिसत आहे.त्यांना सत्तेतून बाहेर पडण्याची वेळ त्यांच्यावर आणली जाईल.

### पवार हे सत्तेसाठी लाचार

दरम्यान काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही अजित पवार यांच्यावर टीका केली. राज्यातील ट्रिपल इंजिन सरकारमध्ये अंतर्गत वाद पराकोटीला गेले आहेत, पण सत्तेसाठी हे सर्वजण एकत्र आहेत. सत्तेसाठी काहीही वाट्टेल ते अशी त्यांची भूमिका आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, उपमुख्यमंत्री अजित पवार हे सत्तेसाठी लाचार आहेत.

अधिकाऱ्याने दिले स्पष्टीकरण

## बिहार निवडणूक निकालापूर्वी RJD चा गंभीर आरोप

# विरोधकांकडून सत्ताधारी भाजपावर गंभीर आरोप

## निवडणूक आयोगाकडून स्पष्टीकरण

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**जनता दल पक्षाने बुधवारी रात्री मत चोरीचे नवीन आरोप केले होते, त्यांनी असा दावा केला की, 'ईव्हीएमने भरलेला ट्रक' मतमोजणी केंद्रात घुसण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा त्यांनी दावा केला होता. या घटनेचा निषेध करण्यासाठी तसेच भारतीय निवडणूक आयोगाकडून स्पष्टीकरण घेण्यासाठी पक्षाचे कार्यकर्तेही या परिसरात जमले होते.**



शुक्रवारी बिहार निवडणुकीच्या मतमोजणी होणार असून यापूर्वी काँग्रेस आणि आम आदमी पक्ष आ सह इतर विरोधी पक्षांनी देखील असेच आरोप केले होते. यादरम्यान बिहारच्या रोहतासचे जिल्हा दंडाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी उदिता सिंह यांनी याबद्दल स्पष्टीकरण दिले असून त्या वाहनातील कंटेनर रिकामे होते असे त्यांनी स्पष्ट केले आहे."कथितरित्या ईव्हीएमने भरलेला ट्रक सासाराम (रोहतास जिल्हा) येथील मतमोजणी केंद्रात जिल्हा प्रशासनाकडून कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय आणि पारदर्शकतेशिवाय का घुसवण्यात आला? ट्रकचालकांना समोर न आणता त्यांना का पळवून लावले? दुपारी २ वाजल्यापासून येथील सीसीटीव्ही कॅमेरा फीड का बंद ठेवण्यात आले? संपूर्ण फुटेज जारी केले जावे! ट्रकमध्ये काय आहे, हे प्रशासनाने सांगावे!" अशी पोस्ट आरजेडीच्या एक्स खात्यावरून करण्यात आली आहे."या घटनेबद्दल माहिती मिळाल्यानंतर ट्रकची सासाराम येथील तकिया बाजार समिती जवळच्या मतमोजणी सेंटरच्या प्रवेशद्वाराजवळ तपासणी केली गेली. ही तपासणी उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांच्या समोर करण्यात आली. या संपूर्ण तपासणीचा व्हिडीओ देखील काढण्यात आला. यामध्ये स्टीलचे कंटेनर पूर्णपणे रिकामे आढळून आले आणि त्यामध्ये कोणतेही ईव्हीएम आढळून आले नाही. त्यामुळे ट्रक भरून ईव्हीएम असल्याचा दावा खोटा आहे," असे निवेदन रोहतासच्या डीएमी दिले आहे.आम आदमी पक्षाचे वरिष्ठ नेते संजय सिंह यांनी गुरुवारी बिहार विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचा आरोप केला आहे. त्यांनी बिहारमध्ये जवळपास ८० लाख मतांची चोरी झाल्याचा दावा केला असून हे भाजपाने घडवून आणल्याचा आरोप केला आहे. मतांच्या कथित फेरफारामुळे निवडणुकीच्या निकालावर मोठा परिणाम होईल, असे सिंह यांनी सांगितले.आम्हाला १४ नोव्हेंबर रोजीच्या निकालाची वाट पाहावी लागेल. मी एक गोष्ट स्पष्टपणे सांगत आलो आहे की,

## ८० लाख मते चोरल्याचा दावा

ट्रकचालकांना समोर न आणता त्यांना का पळवून लावले? दुपारी २ वाजल्यापासून येथील सीसीटीव्ही कॅमेरा फीड का बंद ठेवण्यात आले? संपूर्ण फुटेज जारी केले जावे! ट्रकमध्ये काय आहे, हे प्रशासनाने सांगावे!" अशी पोस्ट आरजेडीच्या एक्स खात्यावरून करण्यात आली आहे."या घटनेबद्दल माहिती मिळाल्यानंतर ट्रकची सासाराम येथील तकिया बाजार समिती जवळच्या मतमोजणी सेंटरच्या प्रवेशद्वाराजवळ तपासणी केली गेली. ही तपासणी उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांच्या समोर करण्यात आली. या संपूर्ण तपासणीचा व्हिडीओ देखील काढण्यात आला.

मत चोरीचा या निवडणुकीवर मोठा परिणाम होईल. हे नाकारलेच जाऊ शकत नाही की बिहारमध्ये ८० लाख मतांची चोरी झाली आहे. ८० लाख मतदारांना त्यांच्या मतदान करण्याच्या हक्कापासून दूर ठेवण्यात आले आहे," असे सिंह म्हणाले.त्यांनी पुढे असाही आरोप केला की मृत नागरिकांच्या नावे बनावट फॉर्म दाखल करण्यात आले आहेत. तसेच त्यांनी हा गैरप्रकार निवडणूक आयोग आणि भाजपा नेत्यांचा सहभाग असलेला एक घोटाळा असल्याचे म्हटले आहे. "निवडणुकीच्या आधी कशा प्रकारे मृत व्यक्तींच्या सह्या असलेले अर्ज सादर केले जात होते, हे आम्ही पाहिले आहे. जे लोक कधीच हजरी राहिले नाहीत, त्यांच्या सह्या असलेले फॉर्म सादर केले जात होते. अशा प्रकारे हा घोटाळा उघडकीस आला आहे, आणि यात ज्ञानेश कुमार, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संपूर्ण भाजपा सहभागी आहे," असा दावा आपचे खासदार सिंह यांनी केला. शुक्रवारी बिहार निवडणुकीच्या मतमोजणी होणार असून यापूर्वी काँग्रेस आणि आम आदमी पक्ष आ सह इतर विरोधी पक्षांनी देखील असेच अरोप केले होते. यादरम्यान बिहारच्या रोहतासचे जिल्हा दंडाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी उदिता सिंह यांनी याबद्दल स्पष्टीकरण दिले असून त्या वाहनातील कंटेनर रिकामे होते असे त्यांनी स्पष्ट केले आहे." येथील मतमोजणी केंद्रात जिल्हा प्रशासनाकडून कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय आणि पारदर्शकतेशिवाय का घुसवण्यात आला?

# परिस्थिती खूप खूप गंभीर आहे!

## सर्वोच्च न्यायालयाची दिल्लीतील प्रदूषणाबाबत महत्त्वाची टिप्पणी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिल्लीतील हवा प्रदूषणाचा मुद्दा गेल्या अनेक दिवसांपासून चांगलेच चर्चेत आहे. आता सर्वोच्च न्यायालयाने देखील गुरूवारी धोकादायक पातळीवर पोहचलेल्या हवेच्या गुणवत्तेबद्दल भाष्य केले आहे. न्यायालयाने दिल्लीतील परिस्थितीत ही अत्यंत गंभीर असल्याचे सांगत वकिलांना सुनावणीसाठी प्रत्यक्षात हजर राहण्यापेक्षा व्हर्च्युअल पद्धतीने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.**

सलग तिसऱ्या दिवशी राष्ट्रीय राजधानी दिल्लीतील हवा धोकादायक पातळीवरच होती. शहरातील हवेची गुणवत्ता निर्देशांक (AQI) हा गंभीर (SEVERE) श्रेणीत कायम राहिला आणि अनेक मॉनिटरिंग स्टेशन्सवर हे आकडे ४०० च्या पुढे गेले होते. बार अँड बेंचने दिलेल्या वृत्तानुसार ,"परिस्थिती खूप खूप गंभीर आहे! तुम्ही सगळे इथे कशाला येत आहात? आपल्याकडे व्हर्च्युअल सुनावणीची सुविधा आहे. कृपया तिचा लाभ घ्या. या प्रदूषणामुळे कायमस्वरूपी नुकसान होईल," असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. दिल्लीतील बिघडत चाललेल्या हवेच्या गुणवत्तेच्या पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती पी.एस. नरसिंहा आणि



न्यायमूर्ती अतुल एस. चंद्रकर यांच्या खंडपीठाने ही टिप्पणी केली.वरिष्ठ वकील कपिल सिब्बल न्यायालयात उपस्थित होते, त्यांनी नमूद केले की अनेक वकील हे आधीच मास्क वापरत आहेत. यावर न्यायमूर्ती नरसिंहा म्हणाले की,"मास्क देखील पुरेसे नाहीत. ते पुरेसे ठरणार नाही. आम्ही याबद्दल सरन्यायधीशांबरोबर देखील चर्चा करू." दिल्लीतील एकूण ३७ हवा गुणवत्ता मॉनिटरिंग स्टेशन्सपैकी गुरूवारी २७ स्टेशन्सवर गुणवत्ता गंभीर एक्यूआयच्या पातळीवर

## दिल्ली हवेची गुणवत्ता

गेल्या अनेक दिवसांपासून चांगलेच चर्चेत आहे. आता सर्वोच्च न्यायालयाने देखील गुरूवारी धोकादायक पातळीवर पोहचलेल्या हवेच्या गुणवत्तेबद्दल भाष्य केले आहे. न्यायालयाने दिल्लीतील परिस्थितीत ही अत्यंत गंभीर असल्याचे सांगत वकिलांना सुनावणीसाठी प्रत्यक्षात हजर राहण्यापेक्षा व्हर्च्युअल पद्धतीने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

असल्याची नोंद झाली आहे. सर्वाधिक प्रभावित झालेल्या काही भागांमध्ये बुरारी (४३३), चांदनी चौक (४५५), आनंद विहार (४३१), मुंडका (४३८), बावाना (४६०), आणि वझीरपूर (४५२) यांचा समावेश होता. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मते, ४०१ ते ५०० दरम्यानचा AQI गंभीर श्रेणीत येतो, ज्यामुळे निरोगी व्यक्तींच्या आरोग्यावरही वाईट परिणाम होऊ शकतो. दिल्लीमध्ये मंगळवारी हवेचा गुणवत्ता निर्देशांक (AQI) ४२८ होता यादरम्यान बुधवारी सीजेआय बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने पंजाब आणि हरियाणा राज्यातील सरकारांना पराली जाळणे रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची विचारणा केली

# तेव्हा माझं करिअर संपेल सलमान खान

बॉलीवूड अभिनेता सलमान खान गेल्या काही दिवसांपासून त्याच्या घरावर झालेल्या गोळीबारामुळे चर्चेत होता. परंतु, सध्या सलमान खानने ३५ वर्षांपूर्वी एक पत्र सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. 'मैंने प्यार किया' चित्रपटाच्या यशानंतर भाईजानने हे पत्र त्याच्या समस्त चाहत्यांना लिहिलं होतं. तसंच अभिनेता म्हणून प्रेक्षकांनी स्वीकारल्याबद्दल सलमानने त्याच्या चाहत्यांचे आभार मानले होते. सलमानचं हे पत्र मूळ स्वरुपात सिने ब्लिट्ज मासिकात प्रसिद्ध झालं होतं.सलमान खानने त्याच्या पत्रात नेमकं काय लिहिलं होतं याची उत्सुकता अनेकांना आहे. अभिनेत्याने त्याच्या लाखो प्रेक्षकांचे कसे आभार मानले जाणून घेऊयात... सलमान लिहितो, "मला आज तुम्हा सर्वांना माझ्याबद्दल काहीतरी सांगायचं आहे. सर्वप्रथम, एक अभिनेता म्हणून मला स्वीकारल्याबद्दल तुमचे खूप खूप आभार...मी माझ्या प्रत्येक चित्रपटात तुमच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करेन. सध्या प्रत्येक चित्रपटाची निवड करण्यापूर्वी मी भरपूर विचार करत आहे. माझ्या विवेकबुद्धीनुसार मी चांगल्या कथांवर लक्ष केंद्रित करत आहे. कारण, मला माहित आहे की, यानंतर मी जे काही चित्रपट करेन त्याची तुलना 'मैंने प्यार किया'शी होणार आहे. त्यामुळे भविष्यात मी जेव्हा पण चित्रपटाची घोषणा करेन तेव्हा खात्री बाळगा की, तो एक चांगला चित्रपट असेल आणि मी त्यासाठी माझे शंभर टक्के देईन."सलमान पुढे लिहितो, "मी तुम्हा सर्वांवर प्रचंड प्रेम करतो आणि आशा करतो की तुम्ही सुद्धा माझ्यावर तसंच प्रेम करत राहाल.

# ३३ वर्षांपूर्वीच्या सुबोध भावेला पाहिलंत का?

चित्रपट असो वा मालिका आपल्या वेगवेगळ्या भूमिकांमधून अभिनयाचं कौशल्य दाखवत प्रेक्षकांची मन जिंकणारा अभिनेता म्हणजेच सुबोध भावे. सुबोधने त्याच्या पत्नी मंजिरीसाठी एक खास व्हिडी शेअर केला आहे. याबरोबरच तो एक नवीन गोष्ट प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येणार असल्याचंही सुबोध म्हणाला आहे. याबाबत सुबोधने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक खास व्हिडीओ शेअर केला आहे.

व्हिडीओमध्ये सुबोध भावे म्हणाला, "नमस्कार, आज आमच्या सेटवरून एक खास गोष्ट तुमच्याशी शेअर करायचीय. नवीन, नाजूक, हळूवार रोमँटीक गोष्ट लवकरच घेऊन येतोय मी तुमच्या सगळ्यांसाठी. आजच्या दिवशी ही गोष्ट शेअर करावीशी वाटली कारण आजचा दिवस खूप महत्त्वाचा आहे. आज ६ मे आणि बरोबर ३३ वर्षांपूर्वी १९९१ साली मी मंजिरीला प्रपोज केलं होतं आणि तिने मला हो म्हटलं होतं.""मंजिरी आठवतंय ना आणि कुठे हो म्हटलं होतस हे आठवतय का? पुण्याच्या बालगंधर्वच्या पुलावर. आमची ही लव्हस्टोरी सुरू झाली मग त्याच्यानंतर तिच काही वर्ष इथे असणं. मग अचानक कॅनेडाला निघून जाणं. मग ती पत्र, चोरून पाठवलेली पत्र, मित्रांच्या नावाने पाठवलेली पत्र, त्यांची वाट बघण्यात गेलेले अनेक दिवस, मग हळूहळू इमेल्स आणि मग ४ ५ वर्षांच्या विराहानंतर मंजिरी परत आली. आठवतंय का?""पण खर सांगतो तुझ्याबरोबर त्यानंतर आयुष्यातल्या सगळ्या सुख दुखांच्या गोष्टी शेअर केले पण तुझ्याबरोबरची प्रत्येक आठवण ही मात्र गोडच आहे आणि मंजिरी तू मला विश्वास दिलास की जगायला श्वासाची नाही प्रेमाची गरज असते.

# नाच गं घुमा!

परेश मोकाशी यांची चित्रपट दिग्दर्शित करण्याची आणि तो हाताळण्याची एक वेगळी हातोटी आहे. 'हरिश्चंद्राची फॅक्टरी'पासून 'वाळवी'पर्यंत हे आपण लक्षात घेतलं आहेच. आता त्यांचा नवा चित्रपट आला आहे ज्याचं नाव आहे 'नाच गं घुमा' मुक्ता बर्वे, नम्रता संभेराव, सुकन्या मोने, सुप्रिया पाठारे, शर्मिष्ठा राऊत, सारंग साठे यांच्या प्रमुख भूमिका असलेला चित्रपट आहे.चित्रपटाची कथा उच्च मध्यमवर्गीय त्रिकोणी घरात घडते. घरात कामासाठी बाई आली नाही किंवा वेळेवर आली नाही किंवा तिने सुट्टीच घेतली तर काय? या आजकालच्या नोकरी करणाऱ्या गृहिणीपुढे पडलेल्या प्रश्नांवर हा चित्रपट आधारलेला आहे. राणी (मुक्ता बर्वे) आणि आनंद (सारंग साठे) यांना शाळेत जाणारी एक मुलगी चिकू (मायरा वायकूळ) आहे. या दोघांनाही नोकरीसाठी जावं लागत असल्याने चिकूला सांभाळण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी बारा तास काम करणारी बाई त्यांना हवी आहे. आशाताई (नम्रता संभेराव) या त्यांच्याकडे येतात. पण त्या वेळ पाळत नसतात. म्हणून राणी त्यांना कामावरुन काढून टाकते. पण मग राणी आणि आनंदची पंचाईत होऊ लागते, पण आशाताईंना परत काम दिलं जातं. आधी वेळ न पाळणाऱ्या आशाताई वेळेवर येऊ लागतात. नंतर एके दिवशी एक घटना घडते ज्यानंतर राणी अक्षरशः हाताला धरुन हाकलून देते. या सगळ्यानंतर काय काय घडतं?, आशाताई असं काय वागतात? राणीचं काय होतं? आनंदची भूमिका काय? या दोघांच्याही आया घरात राहण्यासाठी येतात तेव्हा काय होतं ? या सगळ्यावर सिनेमा भाष्य करतो.



# बांदेकरांनी सांगितला बॉलीवूडचा अनुभव

सुचित्रा बांदेकर यांनी केवळ मराठीतच नव्हे तर बॉलीवूडमध्येही आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. रोहित शेट्टी दिग्दर्शित 'सिंघम' चित्रपटात त्यांनी साकारलेलं 'सुचित्रा भोसले' हे पात्र प्रेक्षकांच्या आजही लक्षात आहे. याशिवाय त्या रणवीर सिंहबरोबर 'सिम्बा' चित्रपटात झळकल्या होत्या. अलीकडेच त्या 'इंडियन पोलीस फोर्स' सीरिजमध्येही झळकल्या होत्या. त्यांचा बॉलीवूडमध्ये काम करण्याचा अनुभव कसा होता याबद्दल नुकत्याच एका मुलाखतीत सुचित्रा बांदेकर यांनी भाष्य केलं आहे. सुलेखा तळवलकर यांच्या 'दिल के करीब' कार्यक्रमात त्यांनी हजेरी लावली होती. बॉलीवूडमध्ये गाजलेल्या 'सिंघम' चित्रपटात काम करण्याची संधी कशी मिळाली याबद्दल सांगताना सुचित्रा बांदेकर म्हणाल्या, "'सिंघम'च्या वेळी मला एका गृहस्थाचा फोन आला होता. त्यांनी मला फोनवर 'सुचित्रा बांदेकर का? आम्हाला तुम्हाला कास्ट करायचं आहे. रोहित शेट्टी प्रोडक्शनमधून बोलतोय.' कारण, मला त्या पहिल्या फोनवर तो 'द रोहित शेट्टी' आहे, तो मोठा दिग्दर्शक असं काहीच सुचलं नाही."सुचित्रा पुढे म्हणाल्या, "त्यानंतर त्या गृहस्थाने मला पुन्हा फोन केला आणि तुम्हाला कळतंय का मला काय म्हणायचंय? असा प्रश्न त्याने मला विचारला. यावर मी म्हणाले.

# कंगनाने अमिताभ यांच्याशी केली तुलना

लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री कंगना रणौत निवडणुकीच्या मैदानात उतरली आहे. ती सध्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात व्यग्र आहे. कंगना हिमाचल प्रदेशातील मंडी मतदारसंघातून भाजपाची उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहे. ती मंडी मतदारसंघात अनेक ठिकाणी प्रचारसभा घेत आहे व रॅलीमध्ये भाषणं देत आहे. आता एका निवडणूक रॅलीतील तिच्या भाषणाची सोशल मीडियावर खूप चर्चा होत आहे. या भाषणात तिने स्वतःची तुलना बॉलीवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांच्याशी केली."संपूर्ण देश आश्चर्यचकित झाला आहे की मी राजस्थानला जावो, पश्चिम बंगालला जावो, दिल्लीला जावो किंवा मणिपूरला, लोक माझ्यावर इतकं प्रेम करतात, इतका आदर करतात. मी दाव्याने सांगू शकते की अमिताभ बच्चन यांच्यानंतर इंडस्ट्रीत इतकं प्रेम व आदर जर कुणाला मिळत असेल तर ती फक्त मी आहे," असं कंगना रणौत प्रचाराच्या भाषणात म्हणाली. कंगना रणौतचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर नेटकरी तिच्या फ्लॉप चित्रपटांचा उल्लेख करत तिला ट्रोल करत आहेत. "कंगनाचा शेवटचा हिट चित्रपट २०१५ मध्ये आला होता आणि त्यानंतर तिने बॅक टू बॅक १५ फ्लॉप चित्रपट दिले आणि इथे ती स्वतःची तुलना अमिताभ बच्चन यांच्याशी करत आहे", अशा शब्दांत कंगनाची खिल्ली उडवत एका व्हेरिफाईड पॅरोडी अकाउंटने तिचा व्हिडीओ शेअर केला आहे.मंडी लोकसभा मतदारसंघासाठी १ जूनला मतदान होणार आहे. हे शेवटच्या, सातव्या टप्प्यातील मतदान होईल. २०१९ मध्ये या मतदारसंघातून भाजपाचे राम स्वरुप शर्मा यांनी निवडणूक लढवली होती व ते विजयी झाले होते. पण २०२१ मध्ये त्यांच्या निधनानंतर या जागेवर झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसच्या प्रतिभा सिंह विजयी झाल्या होत्या.कंगना रणौत मुळची हिमाचल प्रदेशच्या मंडी जिल्ह्यातील आहे. याच ठिकाणाहून तिला भाजपाने लोकसभा निवडणुकीसाठी रिंगणात उतरवलं आहे. याठिकाणी शेवटच्या टप्प्यात मतदान होणार आहे. त्यापूर्वी कंगना रणौत मतदारसंघात फिरून प्रचारसभा घेत आहे.

या निवडणुकीत कंगना रणौतला मतदार स्वीकारणार की नाही ते निकालांची घोषणा झाल्यावरच कळेल.लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री कंगना रणौत निवडणुकीच्या मैदानात उतरली आहे. ती सध्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात व्यग्र आहे. कंगना हिमाचल प्रदेशातील मंडी मतदारसंघातून भाजपाची उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहे. ती मंडी मतदारसंघात अनेक ठिकाणी प्रचारसभा घेत आहे व रॅलीमध्ये भाषणं देत आहे. आता एका निवडणूक रॅलीतील तिच्या भाषणाची सोशल मीडियावर खूप चर्चा होत आहे. या भाषणात तिने स्वतःची तुलना बॉलीवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांच्याशी केली."संपूर्ण देश आश्चर्यचकित झाला आहे की मी राजस्थानला जावो, पश्चिम बंगालला जावो, दिल्लीला जावो किंवा मणिपूरला, लोक माझ्यावर इतकं प्रेम करतात.



**इंडियन्सची मोठी डील!** शार्दुल ठाकूरसह 'हा' पॉवर हिटर ताफ्यात सामील

# IPL 2026 मुंबई इंडियन्सची मोठी डील!

## संघात दोन अष्टपैलू खेळाडूंना सामील

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएल २०२६ च्या लिलावापूर्वी ट्रेड विंडो चर्चेत आहे. गेल्या काही दिवसांपासून ट्रेड डीलबाबत अनेक बातम्या समोर आल्या आहेत. या सर्वांमध्ये, १९ व्या हंगामासाठी पहिली ट्रेड डील जाहीर करण्यात आली आहे. तर दुसरी ट्रेड डीलही काहीच वेळात मुंबई इंडियन्स संघाने जाहीर केली. मुंबई इंडियन्सने लखनौ सुपर जायंट्स व गुजरात टायटन्स या दोन संघांबरोबर ट्रेड करत महत्त्वाच्या खेळाडूंना ताफ्यात घेतलं आहे.**



आयपीएल २०२६ साठीची पहिली ट्रेड डील मुंबई इंडियन्स व लखनौ सुपर जायंट्स यांच्यात झाली. ज्यात मुंबईने मराठमोळ्या शार्दुल ठाकूरला संघात सामील केलं. तो गेल्या हंगामात लखनौ सुपर जायंट्सकडून खेळला होता. देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबई संघाकडून खेळणारा शार्दुल आता आयपीएलमध्येही मुंबई इंडियन्स संघाचा भाग असणार आहे. मुंबई इंडियन्सने इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत याची माहिती दिली. मुंबई इंडियन्सने शार्दुल ठाकूरला रोख रकमेत विकत घेतलं. याचा अर्थ दोन्ही संघांमध्ये खेळाडूंची देवाणघेवाण झाली नाही, उलट मुंबई इंडियन्सने त्याला लखनौ सुपर जायंट्सकडून २ कोटींच्या रोख रकमेत ताफ्यात घेतलं. लखनौ सुपर जायंट्सने गेल्या वर्षी शार्दुल ठाकूरला २ कोटी रुपयांना बदली खेळाडू म्हणून निवडले होते.आयपीएलच्या इतिहासात तिसऱ्यांदा शार्दुल ठाकूरची ट्रेडद्वारे संघात सामील झाला आहे. यापूर्वी, २०१७ मध्ये, रायझिंग पुणे सुपरजायंटने त्याला किंग्ज इलेव्हन पंजाब (आता पंजाब किंग्ज) कडून विकत घेतले होते. त्यानंतर, २०२३ च्या हंगामापूर्वी, कोलकाता नाईट रायडर्सने त्याला दिल्ली कॅपिटल्सकडून विकत घेतले.

हे दोन्ही व्यवहार पूर्णपणे रोख रकमेचे होते. दरम्यान, मुंबई इंडियन्समध्ये येणं ठाकूरसाठी एकप्रकारे घरवापसी आहे. २०१०-१२ मद्ये तो मुंबई इंडियन्ससाठी सपोर्ट बॉलर होता.दरम्यान, मुंबई इंडियन्सने गुजरात टायटन्सचा अष्टपैलू खेळाडू शेरफेन रुदरफोर्डलाही ट्रेडद्वारे विकत घेतले आहे.'

शेरफेन रूदरफोर्डला मुंबई इंडियन्सने २.६ कोटींना गुजरात टायटन्सकडून विकत घेतलं आहे. शार्दुल ठाकूरप्रमाणे ही देखील कॅश डील होती. रूदरफोर्डदेखील अष्टपैलू खेळाडू आहे. वेस्ट इंडिजचा पॉवर हिटर खेळाडू रूदरफोर्ड त्याच्या आक्रमक फलंदाजीसाठी ओळखला जातो. तर तो वेगवान गोलंदाज असून महत्त्वाच्या विकेट्सही संघाला मिळवून देऊ शकतो.आयपीएल २०२६ च्या लिलावापूर्वी ट्रेड विंडो चर्चेत आहे. गेल्या काही दिवसांपासून ट्रेड डीलबाबत अनेक बातम्या समोर आल्या आहेत. या सर्वांमध्ये, १९ व्या हंगामासाठी पहिली ट्रेड डील जाहीर करण्यात आली आहे. तर दुसरी ट्रेड डीलही काहीच वेळात मुंबई इंडियन्स संघाने जाहीर केली. मुंबई इंडियन्सने लखनौ सुपर जायंट्स व गुजरात टायटन्स या दोन संघांबरोबर ट्रेड करत महत्त्वाच्या खेळाडूंना ताफ्यात घेतलं आहे. आयपीएल २०२६ साठीची पहिली ट्रेड डील मुंबई इंडियन्स व लखनौ सुपर जायंट्स यांच्यात झाली. ज्यात मुंबईने मराठमोळ्या शार्दुल ठाकूरला संघात सामील केलं. तो गेल्या हंगामात लखनौ सुपर जायंट्सकडून खेळला होता. देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबई संघाकडून खेळणारा शार्दुल आता आयपीएलमध्येही मुंबई इंडियन्स संघाचा भाग असणार आहे.

मुंबई इंडियन्सने इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत याची माहिती दिली.मुंबई इंडियन्सने शार्दुल ठाकूरला रोख रकमेत विकत घेतलं. याचा अर्थ दोन्ही संघांमध्ये खेळाडूंची देवाणघेवाण झाली नाही, उलट मुंबई इंडियन्सने त्याला लखनौ सुपर जायंट्सकडून २ कोटींच्या रोख रकमेत ताफ्यात घेतलं. लखनौ सुपर जायंट्सने गेल्या वर्षी शार्दुल ठाकूरला २ कोटी रुपयांना बदली खेळाडू म्हणून निवडले होते.आयपीएलच्या इतिहासात तिसऱ्यांदा शार्दुल ठाकूरची ट्रेडद्वारे संघात सामील झाला आहे.

यापूर्वी, २०१७ मध्ये, रायझिंग पुणे सुपरजायंटने त्याला किंग्ज इलेव्हन पंजाब (आता पंजाब किंग्ज) कडून विकत घेतले होते. त्यानंतर, २०२३ च्या हंगामापूर्वी, कोलकाता नाईट रायडर्सने त्याला दिल्ली कॅपिटल्सकडून विकत घेतले. हे दोन्ही व्यवहार पूर्णपणे रोख रकमेचे होते.

### रूदरफोर्डदेखील अष्टपैलू खेळाडू

दरम्यान, मुंबई इंडियन्समध्ये येणं ठाकूरसाठी एकप्रकारे घरवापसी आहे. २०१०-१२ मद्ये तो मुंबई इंडियन्ससाठी सपोर्ट बॉलर होता.दरम्यान, मुंबई इंडियन्सने गुजरात टायटन्सचा अष्टपैलू खेळाडू शेरफेन रुदरफोर्डलाही ट्रेडद्वारे विकत घेतले आहे. शेरफेन रूदरफोर्डला मुंबई इंडियन्सने २.६ कोटींना गुजरात टायटन्सकडून विकत घेतलं आहे. शार्दुल ठाकूरप्रमाणे ही देखील कॅश डील होती. रूदरफोर्डदेखील अष्टपैलू खेळाडू आहे.

# ऋतुराज गायकवाडचं वादळी शतक

## भारताचा द. आफ्रिका अ संघावर दणदणीत विजय

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत अ आणि दक्षिण आफ्रिका अ यांच्यात पहिला अनऑफिशियल वनडे सामना खेळला गेला. या सामन्यात कर्णधार तिलक वर्माच्या नेतृत्वाखालील भारत अ संघाने दक्षिण आफ्रिका अ संघाचा पराभव केला. ऋतुराज गायकवाडच्या वादळी शतकी खेळीच्या जोरावर भारताने दक्षिण आफ्रिका अ संघाला ४ विकेट्सने पराभूत केलं.**





प्रथम फलंदाजी करताना आफ्रिकन संघाने २८५ धावांचा डोंगर उभारला, पण भारताच्या फलंदाजांनी संघाला विजय मिळवून दिला, ज्यात ऋतुराजची सर्वात महत्त्वाची भूमिका होती. राजकोटमध्ये खेळवल्या गेलेल्या या सामन्याची नाणेफेक दक्षिण आफ्रिका अ संघाने जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. यासह संघाने प्रथम फलंदाजी करताना ९ बाद २८५ धावा केल्या आहेत. तर प्रत्युत्तरात भारतीय संघाने ऋतुराज गायकवाडच्या शतकी खेळीच्या जोरावर ४९.३ षटकांत ६ विकेट्स गमावत २९० धावा करत विजय मिळवला.ऋतुराज गायकवाडने १२९ चेंडूत १२ चौकारांसह ११७ धावांची उत्कृष्ट खेळी केली आणि भारत अ संघाला विजयाच्या उंबरठ्यावर आणून ठेवलं.

दक्षिण आफ्रिका अ संघाच्या गोलंदाजांची धुलाई करत ऋतुराजने शतकी खेळी केली. ऋतुराज सध्या उत्कृष्ट फॉर्मात असून त्याने बूची बाबू स्पर्धा, दुलीप ट्रॉफी, रणजी ट्रॉफी आणि आता भारत अ संघाकडून खेळताना शतकं झळकावली आहेतशर्मने पहिल्या विकेटसाठी ६४ धावांची शानदार भागीदारी रचली. अभिषेकने २५ चेंडूत ४ चौकार व एका षटकारासह ३१ धावा केल्या. कर्णधार तिलक वर्मने ३९ धावांचे योगदान दिले.

### ९० धावांची खेळी करत डाव सावरला

इशान किशनने २१ चेंडूत १७ धावा केल्या. त्यानंतर नितीश कुमार रेड्डीने ३७ धावांची तर निशांत सिंधुनेही महत्त्वपूर्ण २९ धावांची खेळी केली. तर हर्षित राणाने एक षटकार लगावत संघाचा विजय निश्चित केला. दक्षिण आफ्रिकेची सुरूवात खूप खराब झाली. आघाडीच्या फळीतील फलंदाज अपयशी ठरले, तर डेलानो पॉटगीटरने ९० धावांची खेळी करत संघाचा डाव सावरला.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। शुक्रवार।
। दि. 14 नोव्हेंबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## सीएसएम ट्रॉफी नॅशनल लेदर बॉल स्पर्धा

# गोपाल मुजमुळेची चमकदार कामगिरी!

### शिक्षण विश्व: आकुर्डी डी.वाय.पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचा अभिमानाचा क्षण

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: डी.वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय आकुर्डी येथील गोपाल मुजमुळे याने आग्रा येथे ७, ८ आणि ९ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या सीएसएम ट्रॉफी नॅशनल लेदर बॉल स्पर्धेत महाराष्ट्र वरिष्ठ संघाचे प्रतिनिधित्व करताना उत्कृष्ट कामगिरी केली आहे.**

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा सायन्स विभागाच्या द्वितीय वर्षातील विद्यार्थी असलेल्या गोपाल यांनी संपूर्ण स्पर्धेत सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट फलंदाजी करत आपली छाप उमटवली. तीन सामन्यांमध्ये त्यांनी एकूण १६० धावा करून संघासाठी मोलाचे योगदान दिले. अंतिम सामन्यात त्यांनी केवळ ३३ चेंडूत ७३ धावांची दमदार खेळी करत संघाला विजेतेपदाच्या शर्यतीत नेले. त्यांच्या या शानदार कामगिरीमुळे महाराष्ट्र संघाने या स्पर्धेत उपविजेतेपद मिळवले.

गोपाल मुजमुळे यांच्या उल्लेखनीय प्रदर्शनाबद्दल त्यांना डीवाय पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून उदयोन्मुख खेळाडू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालय आणि महाराष्ट्र राज्याचा अभिमान वाढला आहे असे महाविद्यालय प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.



## "रीड टू लीड" मधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन!

### शिक्षण विश्व: गायत्री ग्रुप ऑफ स्कूल्स पुणे यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे संचलित गायत्री ग्रुप ऑफ स्कूल्स पुणे यांच्या वतीने "आंत्रप्रेनर्स बुकमार्क – एव्हरी पेज बिल्ड्स अ लीडर" हा प्रेरणादायी कार्यक्रम भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृह येथे भव्य उत्साहात पार पडला.**



#### कार्यक्रमातून मिळाला आर्थिक साक्षरतेचा संदेश

विद्यार्थ्यांनी दिल्ली मार्केटमधील हिरवा बाजार, चप्पलवाली गल्ली आणि पेलीकोटी मार्केट यांसारख्या व्यावसायिक विषयांवरील माहिती दिली. "पैसा का महत्वाचा असतो" या विषयावर नाटक सादर करून विद्यार्थ्यांनी श्रीमंत व्यक्तींच्या उदाहरणांद्वारे आर्थिक साक्षरतेचा संदेश दिला. शिक्षकांनी सादर केलेल्या "कान मुरगळण्यामागचे फायदे" या हलक्याफुलक्या नाटकाने पालकांची मनं जिंकली.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक आणि अध्यक्ष विनायक भोंगाळे उपस्थित होते, तर माइंडमॅपर्स करिअर काऊन्सेलिंग पुणे संचालक दिनेश ताठे यांनी विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना आणि पालकांना बहुमूल्य मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने दीपप्रज्वलन करून करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांनी आणि मान्यवरांनी दीप प्रज्वलित करून ज्ञान, संस्कार आणि नेतृत्वाचा प्रकाश पसरविण्याचा संदेश दिला.

यानंतर व्यवस्थापकीय संचालिका कविता कडू पाटील यांनी स्वागतपर भाषण करून कार्यक्रमाच्या आयोजनाचे महत्त्व सांगितले आणि आलेल्या पालकांचे मनःपूर्वक स्वागत करत आभार मानले. गायत्री स्कूलच्या विद्यार्थ्यांनी "रीड टू लीड" या विषयावर नृत्य सादरीकरण करून वाचनाचे आणि ज्ञानाचे महत्त्व प्रभावीपणे मांडले.

विद्यार्थ्यांनी सामाजिक जीवनातील आर्थिक व्यवहार, बँक कर्ज प्रक्रिया, इम्पोर्ट एक्स्पोर्ट, ट्रेडिंग यांसारख्या विविध व्यावहारिक विषयांवर सादरीकरण केले. "स्वतःची किंमत मार्केटमध्ये कशी वाढवायची" या विषयावर सातवीच्या विद्यार्थ्यांनी आपली स्वतंत्र शैली दाखवत प्रेरणादायी प्रस्तुती दिली.

गायत्री ग्रुप ऑफ स्कूल्स अंतर्गत सर्व शाळांमध्ये "रीड टू लीड" उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता, वाचनाचे महत्त्व आणि राष्ट्र उभारणीत तरुण पिढीचे योगदान यावर विविध उपक्रम राबवले जातात. हा उपक्रम एक चळवळ म्हणून पुढे चालू राहिला तर येणाऱ्या पिढ्यांना नोकरीवर अवलंबून न राहता नोकरी देणारी पिढी घडविण्याचे कार्य गायत्री स्कूल करत असल्याची प्रतिक्रिया पालकांनी दिली.

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा अत्यावश्यक घटक : पांडुरंगनाना गवळी

# "एसपीजी"मध्ये वार्षिक क्रीडा दिन जल्लोषात साजरा!

## शिक्षण विश्व: शिस्त, संघभावना आणि आत्मविश्वासाचा संदेश

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एस.पी.जी. इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये वार्षिक क्रीडा दिन मोठ्या जल्लोषात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा हा अत्यावश्यक घटक असल्याचे प्रतिपादन प्रमुख अतिथी पांडुरंगनाना गवळी यांनी केले..**

कार्यक्रमाची सुरुवात विधिवत सरस्वती पूजनाने झाली. स्वप्नील गवळी आणि प्रविण गायकवाड यावेळी उपस्थित होते. विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. लंगडी, रस्सीखेच, स्टिक द बॉल, क्रिकेट, कबड्डी अशा खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. मैदानावर विद्यार्थ्यांचा उत्साह, खेळाडूपणा आणि संघभावना पाहण्यासारखी होती. स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या विजेत्या विद्यार्थ्यांना मेडल, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी शाळेचे शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया मुळे यांनी केले.




